# ८. वारसा

- सानिया

सानिया (जन्म : १९४२)

स्त्रीवादी लेखिका. कथा, दीर्घकथा, कादंबरी आणि अनुवाद वाङ्मय प्रकारातून लेखन. १९६८ साली 'हरवलेली पाऊलवाट' ही पहिली कथा 'श्री' साप्ताहिकात प्रसिद्ध झाली. यानंतर 'स्त्री', 'मनोहर', 'किर्लोस्कर', 'युगवाणी', 'सत्यकथा', 'मौज', 'हंस', 'दीपावली','मिळून साऱ्याजणी' 'अक्षर', 'माहेर','सकाळ' आदी मासिकातून कथा प्रसिद्ध. 'खिडक्या' 'दिशा घराच्या', 'ओळख' ओमियागे', 'अशी वेळ', 'परिणाम', 'प्रतीती', 'प्रयाण', 'भूमिका', 'वलय', 'शोध', 'पुन्हा एकदा'इ. कथासंग्रह प्रकाशित. 'आवर्तन', 'अवकाश', 'स्थलांतर' या कादंबऱ्या. 'वाटा आणि मुक्काम' हे ललितलेखन प्रकाशित. त्यांच्या लेखनाला वर्टी पुरस्कार, वि.स. खांडेकर स्मृती पुरस्कार, जयवंत दळवी स्मृती पुरस्कार आणि महाराष्ट्र राज्य शासनाचे पुरस्कार प्राप्त आहेत.

सानिया यांची कथा स्वतंत्र्य वृत्तीची असून मनाचे विविध कंगोरे उलगडत जाणारी आहे. त्यांच्या नायिका समंजस, समजूतदार, स्वतंत्र विचार करू शकणाऱ्या आणि मानसिकदृष्ट्या धीराच्या आहेत. मृणाल ही या कथेची नायिका स्वतंत्र्य विचाराची असून ती तटस्थपणे आपल्या आजूबाजूला पाहते. स्वतःचा शोध घेते. एक भूमिका घेऊन ती जगणारी आहे. मूल्यात्मक दृष्टिकोनातून ती सामाजिक जीवनाकडे पाहते. ती निकोप मैत्री जपणारी आहे. स्वाभीमानी, स्त्रीवादी कथानायिका मृणालच्या रूपाने 'वारसा' या कथेतून येते.

---

मृणालने स्वयंपाकघरातून दाराची घंटा वाजलेली ऐकली. इतक्या सकाळी कोण याचं आश्चर्य मनात करत तिने गॅस लहान केला आणि कमरेच्या ॲप्रनलाच ओले हात पुसत दार उघडलं. काही क्षण तिचा विश्वासच बसेना.

'मिलिंद ?... तू असशील दारात याची मात्र जरासुद्धा अपेक्षाच नव्हती, ' ती म्हणाली, तो सौम्य हसला. 'ओळखलंस हेच पुष्कळ.' 'का रे बाबा ?... इतका काही बदललेला नाहीस. थोडासा फरक पडला आहे खरा, पण तो कुणात पडत नाही ? बस... मी येतेच.'

मृणाल आत गेली. मिलींद न बसता तिच्या पाठोपाठ आत आला. खांद्यावरची झोळीवजा बॅग उतरून भिंतीशी ठेवत म्हणाला, 'त्यात सीताफळं आहेत. तुला आवडतात ना ?'

मृणाल मनापासून हसली, 'किती लक्षात ठेवतोस रे!' हे असलं सौरभच्याही कधी लक्षात येत नाही. इतक्या ठिकाणी हिंडतो तो, पण कधी काही घेऊन येईल ? नाव नको...'

'आहे कुठे तो ? झोपला आहे अजून ?'

'छे! तो इथे नाहीच आहे. नेहमीसारखा फिरतीवर...'

मिलिंद चुकचुकला, 'अरेरे... तो भेटेल असं वाटलं होतं म्हणून तर इतक्या लवकर आलो. वाटलं तुम्ही दोघं घराबाहेर पडायच्या आधी मनसोक्त भेटून घ्यावं.'

मृणाल हसली, 'तुझे सगळेच अंदाज चुकले म्हणजे. सौरभ तर नाहीच आहे आणि मी तरी कुठे आता रोज घराबाहेर जाते? गेल्या आठवड्यापासून शाळा तर बंदच आहेत.'

'म्हणजे इथे पण?'...

'अस्थिर वातावरण. म्हणजे तसं खरं इथे काहीच नाही. पण सरकारनं आदेश दिलाय की शाळा-कॉलेजं पंधरा दिवस बंद ठेवा. कायदा आणि सुव्यवस्था...' ती पुन्हा हसली. 'आमचं तर आयुष्य सुरळीत चालू आहे. अभ्यास नसल्यानं मुलं उंडारताहेत एवढंच... पण तुझे काय हालहवाल? तू तर फार बिझी असायला हवास. सध्या तुमचाच मोसम...'

पण मिलिंद गंभीरपणे म्हणाला, 'थट्टा करू नकोस. खरंच तशी परिस्थिती आहे. सगळीकडे केवढं अस्थिर वातावरण आहे जाणतेस तू. इथे एवढं जाणवत नाही खरं. पण मी आता आलो त्या भागातून... कधी काय होईल याचा कुणालाच भरवसा वाटत नाही.'

मृणालनं गॅस बंद केला.

'खाणार आहेस का काही? की चहाच करू?'

मिलिंद अनिश्चितपणे म्हणाला, 'तुझा आजचा मग... काय कार्यक्रम? घरीच असतेस.'

'तशी शाळा बंदच आहे. आज खरं तर ठरवत होते की दादांना भेटून यावं. माझे वडील. तू भेटला आहेस का रे त्यांना ? माझ्या भावाकडे असतात . जरा लांब आहे. दुसऱ्या गावालाच जाण्यासारखं. दोन बसेस घेऊन गेलं तर दीडतास सहज लागतो. त्यातून बसेस मिळत नाहीत वेळेवर. पण म्हटलं अनायासे सुट्टी आहे.त्यांनाही बरं वाटेल. म्हणून तर सकाळी उठून हे करत बसले. काहीतरी घेऊन जायचं डब्यात... पण का रे ?'

'नाही. म्हणजे... माझा खरा असा प्लॅन होता की कसंही करून तुम्हा दोघांना सुट्टीच घ्यायला लावायची. मी तसा मोकळाच आहे आज.'

'मोकळा? आश्चर्यच आहे.'

तो अवघडून हसला. 'हो. मुद्दाम... ते नंतर सांगेन. पण तुझ्या कार्यक्रमाआड नाही यायचं मला. तू जा. मी निघेन थोड्या वेळानं...'

तिनं किंचित विचार केला. मग म्हणाली, 'मी जायला हवं. कारण काल रात्रीच भावाला निरोप देऊन ठेवला आहे. आता गेले नाही तर त्यांना काळजी वाटेल. भावाच्या घरी फोनचं कनेक्शन चालू नाही. त्याच्या फॅक्टरीत निरोप द्यावा लागतो.. असं करूया का? तुला जर वेळ आहे तर तूच ये ना माझ्याबरोबर. आपल्याही गप्पा होतील. मलाही जायला यायला कंपनी. दादांशीही बोल. त्यांना आवडेल. तसे एकटेच असतात ते. भावाचं घर म्हणजे एक प्रकारचं फार्महाऊसच आहे. ते पण पहा... कशी आहे कल्पना?'

मिलिंद हसला आणि पटकन हो म्हणाला. तिनं डबा भरला. म्हणाली, 'हे घे, खाऊन टाक. तोपर्यंत मी तयारी करून येते, मग चहा घेऊ की निघूच.'

मिलिंद कशालाच नाही म्हणाला नाही. चहा घेताना पेपरवर नजर टाकत मृणाल



Scanned with OKEN Scanner

म्हणाली, 'आजकाल बातम्या वाचा नाही तर टीव्ही पहा. सगळीकडे तेच ते अस्थिरता, दंगल, हिंसा. कुठलाही विषय असो की लागले सगळे पेटवायला.स्वतःला नि देशाला. अराजकता नुसती... तुला नाही का रे वाटत असं? कसा काय तू राजकारणात पडलास?'

मिलिंद नजर दूर लावत म्हणाला, 'वाटतं ना? राजकारणात पडल्याचं म्हणशील तर तुला माहीत आहे, आमच्या घरात ते आहे. वडील, काका सगळे कुठल्या ना कुठल्याही तऱ्हेनं राजकारणातच होते. मी तसाच तर मोठा झालो.

'पण त्यांच्या राजकारणाला निदान काही शिस्त होती. ध्येय तरी? पण आता..... ती उठली, 'निघूया का? असल्या बोलण्याला काही अर्थ नाही. आपण तिघांनी मिळून यावर रात्र रात्र चर्चा केल्या आहेत, आठवतं?'

'अर्थात,' तो चटकन म्हणाला, 'ते काही विसरण्याजोगं थोडंच आहे? तुम्ही दोघंही कधी माझी थट्टा करत राहायचात, नाही तर मी कसा या क्षेत्रात पडायला अयोग्य आहे ते पटवण्याचा प्रयत्न करायचात.'

'पण काही उपयोग झाला नाही.' खाली येता येता ती म्हणाली,'तुझं तू खरं केलंसच.'

'दुसरा काही पर्यायच नव्हता गं.'

'खरं? तिला हसू आलं. 'का रे नव्हता'? नोकरी घेतली असतीस, लग्न केलं असतंस, मुलं-बाळं झाली असती की आपोआप राजकारण लांबच राहिलं असतं नं? ते काही न करता...'

'ते कधीच करावंसं वाटलं नाही. आणि तुला माहीत आहे. सुरुवात केली तेव्हा काही पार्टीत वगैरे पडायचा हेतू नव्हता. उलट वडिलांशी सतत वादच व्हायचे. माझी सुरुवात तर मी केवळ सामाजिक कार्यापासून केली. कुणी काही म्हणोत. तेव्हा केलेलं काम खरंच तळमळीचं, प्रामाणिक होतं. समाधान देणारं पण.'

दोघं बससाठी उभी राहिली. सकाळचं ऊन अजून तरी प्रसन्न होतं. पण बससाठी चिकार गर्दी होती. ऑफीसला जाणारे, तरुण -वृद्ध, बायका-पुरुष, मुलंसुद्धा.

'आणि आता?' मृणालनं विचारलं.

'कुणास ठाऊक. तेवढ्या खात्रीनं काही म्हणवत नाही.' मग तो लगेच म्हणाला, 'पण हे मी फक्त तुझ्यापाशीच बोलतो आहे हं. माझ्या सहकाऱ्यांशी असं कधीच म्हणणार नाही.'

ती किंचित हसली. लांबून येणाऱ्या बसचा नंबर पाहू लागली. एक गच्च भरलेली बस पुढ्यात आली. थोडे लोक उतरले पण दुपटी-तिपटीने आत चढू लागले. ड्रायव्हर शांतपणे वाट पाहू लागला. कंडक्टरही सगळ्यांना आत शिरू देऊ लागला. आत आल्यानंतर खेकसत म्हणला की, 'पुढे व्हा. मध्येच उभे राहू नका.'

मृणाल म्हणाली, 'बघ, केवढी ही गर्दी. आता तर बसेस पण कमी केल्यात म्हणे. मुळात होत्या किती? गर्दीला कधी न पुरणाऱ्या, तरीही लोक धडपडून जाताहेत. आणि कुणाची तक्रार नाही.'

मिलिंद म्हणाला, 'तेच तर खरं आहे. तक्रार करावी तिथे कुणी करत नाहीत.'

ती म्हणाली, 'पण भलत्याच विषयावर करतात नं. तूच सांग तुला पटतात का सध्याचे विषय? ज्यावर पेटून उठावं असे आहेत का ते? कुठलाही सुशिक्षित सुसंस्कृत



Scanned with OKEN Scanner

माणूस तसं म्हणू शकणार नाही. हे सगळे राजकारण्यांचे खेळ असतात. सामान्य माणसाला कुठल्याही नाजूक विषयाची कास धरून भडकवून द्यायचं, त्यात त्याचा बळी जातो आणि यांची पोळी पिकते.'

मिलिंदनं एकदम तिच्या दंडावर हात ठेवला. तिनं चमकून पाहिलं. मग हसत म्हणाली, 'अरेच्या... तू त्यातला हे लक्षात घेऊन नाही हं म्हटलं मी. तुझ्या वैयक्तिक गुणांबद्दल कधी शंका येऊच नये. पण तू ज्या कळपात शिरला आहेस त्यांच्याबद्दल... दिवसेंदिवस घृणा यावी असं घडतं आहे. आमच्यासारख्या शिक्षित मध्यमवर्गीयांची ही तऱ्हा, मग इतरांचं काय ?'

मिलिंद बोलला नाही. गप्प हाताची घडी छातीवर घेऊन उभा राहिला. बस आली. मृणाल म्हणाली, 'चढ हं चटकन. गर्दी बघ किती आहे.' सगळ्या लोंढ्यात दोघे वर ढकलली गेली. गर्दीत हात वर करून दांडा पकडून कशीबशी उभी राहिली. मृणालने नोट हातातच ठेवली होती. इथे बोलणं शक्यच नव्हतं. बस पुढे निघाली. गर्दी मागेपुढे सरकली. तेवढ्यात मृणाल वळून मागे उभ्या असलेल्या मिलिंदला म्हणाली, 'नंतर आपण टर्मिनसवरूच बस घेऊ. तिथे बसायला मिळेल.'

तरी तिथेही रांग होतीच. ऊन आता जरासं तापलं. स्टॉपवर नेमकी शेडही नव्हती. मृणाल म्हणाली, आता बाकी काय उद्योग असतो तुझा ?

'बाकी काही नाही. पूर्ण वेळ हेच.'

'मग आता कसा मोकळा ?'

'तुमच्यासाठी'

तिला हसायला आलं, 'खरंच वाटेल कुणाला.'

त्यानं स्पष्टीकरण दिलं नाही. मग विचारलं, 'तुझी शाळा काय म्हणते ?'

'सध्या बंद आहे म्हटलं नं. पण नाहीतर... छान चालली आहे की.'

'कितवीचे वर्ग आता ?'

'पाच, सहा,सात. सायन्स, बायालॉजी, फिजिक्स,-केमिस्ट्री. तेवढ्या वर्गांचं सगळं घेते.'

'तुला आवडतं नं ?'

'अर्थातच. का रे ? एखादी नोकरी बिकरी देतो आहेस का ?'

'छे ! मी कोण देणारा ?'

'वा रे वा ! तुच तर खरा. पुढेमागे असा होशीलही कुणी. नोकरी मागायला यायला लागेल तुझ्या दारात...'

'मृणाल...' तो एकदम निराळ्याच स्वरात म्हणाला, 'तुम्ही तसे येणार नाही.'

'आम्ही ? मी नि सौरभ ? बहुतेक नाहीच. आम्हाला आहेतच की नोकऱ्या आणि मुलाबाळांचा काही प्रश्नच नाही.' असं म्हणून ती गप्प झाली.

बस रिकामी समोर येताच एकच झुंबड उडाली. पण मृणालने चटकन प्रवेश करून दोन जागा पकडल्या. मिलिंद शेजारी बसल्यावर म्हणाली, 'आता अर्ध्या तासाची निश्चिंती. एरवी मला तर झोपच येते. पण आज तू आहेस गप्पा मारायला.'

बस यथावकाश भरल्यावर सावकाश निघाली. रस्त्याला लागली. मिलिंदनं विचारलं, 'एक विचारू ? रागबिग आला तर सोडून दे, उत्तर देऊ नकोस.



Scanned with OKEN Scanner

वेडा आहेस.'

'तुम्हाला मूल नसल्याचं दुःख होतं?' मृणाल हसू लागली. 'एवढंच? खराच खुळा की रे तू. तुला कशावरून वाटतं की आम्हाला मूल होत नाही? कशावरून आम्ही ते नकोच असा निणर्य नाही घेतलेला?'

मिलिंदने चकित दृष्टीने तिच्याकडे पाहिलं, 'असं आहे?'

'का ? असू शकत नाही?' 'फार क्वचित...' 'पण शक्य तर आहे. कधी कधी खरंच आम्ही म्हणतो, काय हे आयुष्य. दिवसेंदिवस अवघड होत जाणारं. परिस्थिती इतकी भयाण, होपलेस वाटते की याला काही भविष्यच दिसत नाही. मग वाटतं बरं आहे कुणी आपल्यामागे नाही. त्याला किंवा तिला देण्याजोगा वारसा तरी काय आहे? कुठल्या बळावर जगात एक जीव आणायचा? जन्मापासून सगळ्या चिंता, पैसा पुरवायला हवा, अधिक मिळवायला हवा, मग दोघांपैकी कुणी तडजोड करायला हवी. इतकं करून ते मूल मोठं होत गेलं की शाळेसाठी धडपड! मग शिक्षण किती वाईट, निरुपयोगी आहे हे माहीत असून त्याला पर्याय नाही म्हणून ओरडा. पुढे काय? मोठेपणी ते मिळवेल कसं? त्याला प्रामाणिक, कष्टाळू व्हायची दीक्षा द्यायची आणि शिक्षाच करायची? की असत्याची, हिंसेची लेणी देऊन लायकी वाढवायची? केवढा हा कोंडमारा. स्वतःचंच आयुष्य कठीण झालेलं, गोंधळून टाकणारं. मग नवीन आयुष्य सुरू तरी का करायचं?'

मिलिंद म्हणाला, 'किती निराशावादी बोलतेस गं!'

'हे खरं नाही?'

'नाही तरी कसं म्हणू? पण ते बदलणार नाही का?'

'असं वाटतं आहे का तुला? खरं सांग... तुझ्या भूमिकेतून उत्तर देऊ नकोस. एक व्यक्ती म्हणून, मिलिंद नावाचा आमचा प्रिय मित्र म्हणून सांग...'

मिलिंद तिच्या पलीकडे खिडकीतून बाहेर पाहात राहिला.

'फारच अडचणीत टाकलं ना मी तुला?'

'तसं नव्हे मृणाल... पण... ते खरंही आहे आणि नाही पण. तू म्हणतेस त्यात बदल होणारच नाही. पण तसं तरी कशावरून? आपण अमुकच एक असं धरून चालू शकतो का? कुणीतरी बदल करायलाच हवेत. काय नेम.. अजून दहा वीस तीस वर्षात परिस्थिती पालटेल...'

मृणाल हसली,'तुझ्या स्वरातच दम नाही मिलिंद. मी म्हटलंच होतं तुला की तुझ्या भूमिकेतून बोलू नकोस, पण तुला तर सवय झालेली.'

'प्लीज मृणाल...'

'मग काय तर. काय पण उत्तर दिलंस!'

'मी' 'तुझ्याइतका निराशावादी नाही.'

'चांगलं आहे!'

'खरंच असं बघ... तुझं आणि सौरभचं मूल असा विचार केला तर ते कसं असेल? हुशार, देखणं, कलावान, संवेदनशील, मूल्यांची चाड असलेलं... असंच ते वाढेल नं? तुम्ही त्याला केवढं काही देऊ शकाल?' आणि तशा व्यक्तीची आज केवढी गरज आहे, नाही?'

मृणाल म्हणाली, 'हे सगळं खरं नाही. आजच्या परिस्थितीत तसं असून काही

उपयोग नाही. तसं असल्याचाच कधी-कधी फार त्रास होतो.'

'असं नको म्हणूस.'

'का नको ? सौरभ फिरतीहून येतो तेव्हा कित्येकदा वैतागलेला असतो. एवढ्या ठिकाणी हिंडूनही त्याला त्याच्यासारखी माणसं अगदी क्वचित भेटतात. इतकं कशाला, मला तर माझ्या विचारांशी जुळेल असं शाळेत देखील कुणी मिळत नाही. मी काही उत्साहानं बोलायला गेले तर सगळी त्यावर हसून नाहीतर उडवून सरळ पाणी ओततात. आपण काही मनापासून शिकवावं, मुलामुलींना काही अधिक द्यावं एवढंसुद्धा कुणाला वाटत नाही. अरे, एकदोन गुणांसाठी घासाघीस करणारे पालक जेव्हा पेपर घेऊन भांडायला येतात तेव्हा त्यात काही चुकीचं आहे असंसुद्धा कुठल्या शिक्षकाला वाटत नाही. उलट पालकांवर कशी मात करायची याचा विचार ते करतात. उद्विग्नता येते ते पाहून.'

मिलिंदने हलकाच सुस्कारा टाकला. मग म्हणाला, 'सौरभची भेट व्हायला हवी होती.'

'हो.नं. त्याला फार आनंद झाला असता. बहुतेक तीन एक दिवसात यावा तो. पण सध्याचं वातावरण असं. इकडे काही नाही म्हणता म्हणतासुद्धा ट्रेन्स रद्द झालेल्या ऐकल्या... तू थांबू नाही शकणार ?'

'नाही नं. म्हणून तर...'

'मग पुन्हा ये. लवकर ये, पण... मध्ये अशी वर्षवर्ष जाऊ देऊ नकोस.'

मिलिंद बोललाच नाही. तीही गप्प राहिली. बस आता जवळजवळ शहराच्या बाहेर आल्यासारखी वाटली. पण विस्ताराच्या खुणा जागोजाग होत्या. स्टॉपवर उतरून दोघं चालत निघाली. रस्ता पक्का होता. दुकानं होती. लांब लांबची घरं .

मिलिंद म्हणाला, 'आहे छान जागा.'

पूर्वी अगदी कुठल्या कुठे वाटायचं. आता तसं नाही. दुकानं आहेत. शेजार आला... ती दिसते ती माझ्या भावाची फॅक्टरी इकडून गेलं की घर...'

मृणालनं गेट वाजवलं. लगेच कुत्रा मोठा, भुंकत आला. मागून मुलगेलासा नोकर त्याला आवारात बांधून ठेवायला धावला. गेट उघडलं. दादा प्रशस्त व्हरांड्यातच बसले होते. मृणाल हसून म्हणाली, 'बघितलंस ? वाटच पाहात असतील.'

तिनं मिलिंदची ओळख करून दिली. म्हणाली , 'मला वाटतं तुम्ही एकदा माझ्याकडे असताना हा आला होता. आठवत नसेल पण पूर्वी याचे वडील... तुम्हाला ऐकून तर माहीत असेल ?'

'तुम्ही काय करता ?' दादांनी विचारलं.

मिलिंद हसून म्हणाला, 'खरं म्हणजे काहीच नाही.'

मृणाल म्हणाली, 'काय रे उत्तर देतोस. हा पण त्यातच आहे दादा. राजकारणात कशाकशात असतो. आम्हाला पण धड सांगता यायचं नाही. आमचा मित्र आहे खरा.' मग ती आत गेली. वहिनी, मुलं यांची चौकशी करायला, बाहेर दादा त्याच्याशी तोपर्यंत गप्पा मारतील हे माहीत होतं. शाळा नसल्यानं मुलं व्हिडीओ लावून बसली होती. वहिनी स्वयंपाकघरात होती. नेहमीची चौकशी, गप्पा झाल्या. मग दोघी बाहेर आल्या. बाहेर सुंदर राखलेल्या बागेमुळे उन्हाच्या वाढत्या झळाही जाणवल्या नाहीत. नोकराने आधी सरबत आणून ठेवलं. दादांनी मृणालची, सौरभची चौकशी केली. मग भावाची जेवणाच्या वेळेपर्यंत

वाट पाहता पाहता गप्पाच रंगल्या. नेहमीसारख्या अनेक विषयांवर. भाऊ आल्यावर सगळी एकदमच मोठ्या टेबलाशी बसली. सगळं साग्रसंगीत, गरमगरम जेवण, तव्यावरून पानात पडणारे फुलके, भाजी-आमटीची पातेलीही गॅसवरच ठेवली होती. वहिनी सगळयांचं पाहून मगच जेवायला आली. मग बाकीची धावपळ नोकर करू लागले.

भाऊ म्हणाला, 'आता दिवसेंदिवस सगळं कठीणच होत चाललं आहे. माझंच पाहा... गेला महिनाभर आमचं मटेरिअलच येत नाही. निदान दिलेला कोटा तरी पूर्ण व्हावा अशानं कमिट केलेल्या ऑर्डर्स तरी कशा पूर्ण करायच्या? हातच्या जाण्याचाच संभव अधिक, शिवाय सगळी महागाई वाढल्याने लेबरच्या मागण्यांना तर अंतच नाही. एवढ्या तेवढ्याला धमक्या देत असतात.'

दादा म्हणाले, 'पूर्वी असं नव्हतं. मूल्यांना काही चाड असे. काही का असेना, भ्रष्टाचार असेलही थोडाफार. पण एवढा?

आता तर शिपायापासून मंत्र्यापर्यंत सगळेच भ्रष्ट. हात ओले केल्याशिवाय काही हलतच नाही. हो ना रे?'

मृणाल जराशी अस्वस्थ झाली. मग हसून म्हणाली, 'सगळंच सरसकट म्हणू नका हं. आपण खुद्द कुठे तसं करतो? कितीही तक्रार केली तरी शेवटी आपण असतोच ना सरळ? प्रामणिक?... ' मग तिनं मिलिंदकडे पाहिलं. तो खाली मान घालून जेवत होता. 'काय रे मिलिंद?...'

त्यानं वर पाहिलं. मग म्हणाला, 'तुम्ही म्हणता ते खोटं आहे असं नव्हे, पण...'

भाऊ म्हणाला लगेच, 'असेल कसं खोटं? खरंच आहे... मी आता फॅक्टरी सुरू करून इतकी वर्ष झाली. मला, सगळ्या खाचाखोचा ठाऊकच आहे.'

मृणाल चटकन बोलली, 'म्हणजे आपलाही हातभार लागतोच नं त्याला असंही नाही का ते?'

'काय करणार? धंद्यात टिकायला धंद्याच्या युक्त्या वापरायला लागतात.'

'मग, तक्रार कशाला? सगळेच एका पंथाचे...'

वहिनी एकदम चमकून पाहू लागली.

'मृणाल..... खिरीच्या वाटीला हात लावलेला नाहीस हं. पुन्हा भरणार आहे मी ती.'

मिलिंद म्हणाला, 'फार छान आहे जेवण.' मग थांबून त्यानं जोडलं, 'असं घरचं छानदार खायचा योग मला नेहमीनेहमी येत नाही.'

वहिनी म्हणाली, 'येत जा की मग. आमच्या घरी, काय नेहमी असतातच कुणी ना कुणी. तुमचं एक पान काही जड नाही.'

मिलिंद सौजन्यानं आभाराचं हसला. पण येईन, येणार नाही काहीच म्हणाला नाही. त्याने मग मुलांशीच संभाषण सुरू केलं. दादाही त्यात सामील झाले.

मृणाल आवरायला वहिनीला मदत करून बाहेर आली. भाऊ म्हणाला, 'मी निघतो लगेच. फार कामं आहेत... ओळख असू द्या.' तो मिलिंदला म्हणाला, 'येत जा कधीही या भागात आलात तर. पुन्हा आलात की फॅक्टरीवर घेऊन जाईन.' मग हसत म्हणाला, 'तुमच्यासारख्यांची धूळ झडलेली बरीच.'

मृणाल ते न आवडल्यासारखी म्हणाली, 'मिलिंद आमचा फार जुना मित्र आहे.'



Scanned with OKEN Scanner

मग भाऊ गेला. दादा त्यांच्या खोलीत विश्रांतीसाठी गेले. वहिनी मुलांना 'व्हिडीओ पुरे, काही वाचा, करा' म्हणत आत गेली आणि व्हरांड्यात उरली दुपारची सुस्त शांतता. मिलिंद म्हणाला, 'तू फारशी येत नाहीस का इथे?'

मृणालनं चमकून पाहिलं, 'तुला कसं काय...' असं म्हणता म्हणता थांबली, 'येते कधीतरी, लांब आहे तसं. दादांना भेटायला येते. सौरभला वेळच होत नाही. शिवाय तसं माझ्या भावाचंही आयुष्य... वेगळंच. घाईचं. जेवायला नेहमी कुणी असतं. पार्ट्या असतात. हे सगळं आणि आमचं जमतंच असं नाही.'

मिलिंदनं विचारलं, 'बागेत फेरफटका मारूया? तू म्हणालीस, मागे शेत आहे.'

'आहे ना. चल...' दोघं खाली उतरली. बंगल्याच्या मागे फळबाग होती. विहीरही होती. मग उतरून वाट जाईल तिथे लहानच पण लागवडीचे चौकोन होते.

मृणाल म्हणाली, 'त्यानं फार पूर्वीच ही जागा घेतली. हुशार आहे. त्यावेळी स्वस्तात पडली. आता काय... फॅक्टरीही इथेच. बंगला, नोकरचाकर, बागा, कशाला कमी नाही.'

मिलिंद हसला. म्हणाला, 'मला नाही असं वाटत.'

'काय नाही वाटत?'

'कशाला कमी नाही असं. कमी असतेच मृणाल. कसलीतरी नेहमीच कमी असते. तू विचारून पाहा. खरं उत्तर मिळेल, अशी जेव्हा खात्री असेल तेव्हा तुझा भाऊ, वहिनी, अगदी मुलंसुद्धा त्यांच्याकडे काय नाही त्याची यादी वाचतील.'

मृणालनं थांबून त्याच्याकडे पाहिलं.

'तुझं त्यांच्याबद्दल मत...तितकंसं चांगलं झालेलं दिसत नाही.'

'नाही. नाही. तसं नाही... गैरसमज करून घेऊ नकोस. सगळी फार चांगली आहेत. माझ्यासारख्या अचानक पाहुण्याचा इतका आदर सत्कार केला. जेवू घातलं!'

'त्यात काही विशेष नाही. इकडे नेहमीच असे पाहुणे टपकतात. त्यांना सवय आहे. कोण कधी उपयोगी पडेल याचा नेम नसतो म्हणून, सगळ्यांना ते आतिथ्य दाखवतात.' मृणाल थांबून म्हणाली, 'तुला तसं काही वाटलं असेल तर त्यातही चुकीचं काही नाही. मलाही... पुष्कळदा तसंच वाटतं.'

'तसंच?'

'म्हणजे माझं यांच्याशी असलेलं नातंच उमजून येत नाही. ते आपलं जन्माचं आहे म्हणून आहे असं वाटतं. तशी सगळीजण प्रेम करतात माझ्यावर. म्हणजे मला तरी तसं वाटतं. गेले की मायेनं वागवतात. पण... ते नातं नाही मिलिंद. नातं खरं ते, जे आपल्याला कुणा व्यक्तीच्या अंतरंगाशी वाटतं. आपल्याच जातीचा हा माणूस आहे हे पटून वाटतं. पण या अशा नात्यांना कुठे किंमतच नसते. कुणी ते ओळखतच नाही. सगळी आपली वरवरच्या पारंपरिक नात्यातच जखडून राहतात. जन्माच्या, जन्मलेल्या जातीच्या, धर्माच्या, भाषेच्या...मग आपण आपली म्हणू अशी माणसं असतात कुठे? भोवती पसरलेल्या लाखो माणसांतून ती शोधून कुठे काढायची? तेवढा वेळ असतो का आयुष्यात? असला तर ती भेटतीलच याची काय खात्री? आणि भेटली तरी त्यांना आपल्याशी बांधून कुठे ठेवता येतं? ... हा सगळा विचार करता करता... थकायला होत. निराशाच दिसते.'



Scanned with OKEN Scanner

'नाही मृणाल. मी तुला निराशावादी म्हटलं ती चूकच झाली. तू तर फार आशावादीच आहेस. या असल्या सध्याच्या जंगलातही तुला तुझा शोध घ्यावासा वाटतो.'

'पण उपयोग काय आहे रे त्याचा ? हे असंच आयुष्य संपायचं!'

कुठलेतरी पक्षी एकदम चित्कार करीत उडाले. दोघांनी त्या दिशेनं पाहिलं. सगळीकडे तशी शांतता होती आणि नव्हतीही. लक्ष दिलं तरी कितीतरी आवाज ऐकू येत होते. गाडीचे हॉर्न, कुठला तरी अस्पष्ट भोंगा, कुत्र्याचं भुंकणं कावळ्याची कावकाव, धुण्याचा आवाज, कुणाची तरी ललकारी....

मिलिंद म्हणाला, 'मी आता जातो आहे.'

'जातो आहेस ? कुठे ?'

'तुला म्हणालो ना मघाशी... या अशा परिस्थितीत... आता पुरता जखडला गेलो आहे. आता माघार घेता येणार नाही. इतके दिवस लहानसहान कामं केली. ओढवून घेतली. आता राजकारणाच्या मोठ्या, खऱ्या, बेगडी चक्रात पूर्ण अडकणार आहे. पूर्ण वेळ, कदाचित निवडणुकीला उभा राहीन. निवडूनही येईन. कुठलीतरी जागा भूषवेन. तिथून परत येणं नाही.'

मृणाल त्याच्याकडे पाहात राहिली. 'पण... इतके दिवसही तू तेच करत होतास नं. ? आम्ही तुला माधारी राजकारणी मित्र म्हणून ओळखतो.'

'पण ते जग छोटं होतं आणि बरचसं माझं स्वतःचं प्रामाणिक, खरं होतं.आता यापुढे ते तसं असणार नाही. ते पूर्ण गुंतागुंतीचं, खोटं, सत्तेचं, छक्यापंजाचं असणार आहे'

मृणाल त्याच्याकडे अविश्वासानं पाहातच राहिली. 'हे सगळं जाणून उमजून बोलतो आहेस तू? आणि तरीही...'

'तरीही! कसं सांगू तुला? पण तू आणि सौरभ याखेरीज कुणाला ते समजेल असं वाटतही नाही. म्हणून तुम्हाला भेटायला आलो. वेळ नव्हता, लांब जायचं होतं तरीही आलो. मुद्दाम ठरवून...' एकाएकी मिलिंदचा आवाज अडला. मान फिरवून त्यानं लांबवर नजर टाकली. मग पुन्हा तिच्याकडे वळून म्हणाला, 'मी अशा वाटेवर आहे जिथून परत येणं शक्य नाही. एकदा पुढे गेलो की मागची वाट संपते. हे सारं माहीत आहे मला तरीही काही पर्याय नाहीत. आता या टप्प्याला नाहीत. ते तसे कधी होते असंही वाटत नाही. तुला म्हणालो मी, लहानपणापासून मी तसाच घडला गेलो. माझ्याकडून तशाच अपेक्षा केल्या गेल्या. तरीही कुठेतरी आत कदाचित... प्रामाणिक जिवंतपणा होता. इतके दिवस तो लढून, धडपडून जपला. तुझ्या-सौरभच्या मैत्रीत. कितीही कमी क्षण का होईना पण ते जमलं... आता ते कदाचित तसं जमणार नाही.मी आता हरवून जाणार आहे. मला ते तसं पूर्ण स्पष्ट दिसतं आहे. ज्या तऱ्हेच्या लोकांत मी ओढला गेलो आहे. जे खेळ सत्तेचे, राजकारणाचे, सध्याच्या परिस्थितीचा फायदा उठवून खेळायचे आहेत त्यात मी एक भिडू म्हणून केव्हाच नियुक्त झालो आहे. त्यात जाऊन हरवण्यापूर्वी... मी तुमचा निरोप घ्यायला आलो.'

मृणाल अजूनही अनिश्चित अविश्वासानं त्याच्याकडे पाहात होती.

'पण मिलिंद हे जर तुला इतकं स्पष्ट जाणवत आहे तर...'

'तीच तर फार मोठी किंमत आहे गं मृणाल...' तो आवेगात म्हणाला, 'हे मला कळतं आहे. बहुतेकांना ते कधी जाणवतही नाही. मी जेव्हा आपल्या नेत्या श्रेष्ठींकडे पाहतो तेव्हा मलाही असाच अचंबा वाटत आला आहे की, याचं हे रूपांतर झालं तरी कधी आणि



Scanned with OKEN Scanner

कसं ? आणि पाहता पाहता त्याच साऱ्यात मीही जखडला गेलो आहे हे लक्षात आलं. फक्त मला ती भाजती जाणीव आहे. रूपांतर होताना आपल्या आतलं खर, कोवळ, प्रामाणिक, काही टिकूच न शकणारं असं, आजच्या जगातलं जगायला नालायक असंच काहीतरी हळूहळू वितळून जात आहे. ते लक्षात आलं आणि वाटलं हे तुम्हाला सांगायला हवं. तुमचा निरोप घ्यायला हवा. यापुढे आता कदाचित आपण असे कधीच भेटणार नाही. तुमचं आयुष्य तुम्ही जगत राहाल. अडचणीचं, निराशेचं, पण तरीही कुठेतरी आशा शोधत... आणि मी फार पुढे... निराळ्या जगात ... ज्या सत्तालोलुपांचा, भ्रष्टाचाराचा तुम्ही तिरस्कार करता त्यांच्यात... तेव्हा कदाचित तुझ्या भावासारखं कुणी एकीकडे शिव्या घालत पण दुसरीकडे लाल गालिचे पसरत त्या खुर्चीचा मान म्हणून हवं ते करवून घ्यायला, जेवायलाही बोलवेन आणि मृणाल... मी जाईन. कारण एकदा खेळात पडलं की त्या खेळाचेही नियमच असतात. जिंकलं न जिंकलं तरी विजय मिळवायचा या ईर्षेनं तरी खेळायलाच लागतं. तेव्हा आपण मात्र ... भेटू शकणार नाही. भेटलो तसे तरी... बोलणार नाही. कारण तोपर्यंत आपण... मी तुम्हाला हरवून टाकलेलं असेलं...'

मिलिंदचा चेहरा बघता बघता कातर झाला. खालचा ओठ घट्ट दातात धरून तो आरपार हरवल्यासारखा कुठेतरीच पाहू लागला. मृणालच्या आत खोलवर काहीतरी उचंबळून आलं. तिला वाटलं, तो काय म्हणतो आहे ते आपल्याला किती स्पष्ट जाणवलं आहे. तो म्हणतो आहे ते आणि म्हणत नाही आहे ते देखील. किती वर्षांचा हा जुना मित्र. सौरभचा, आपला, घरी येणारा, जेवणा-राहणारा, खूप बोलणारा, निराळा. नेहमीच्या व्यवहारात अनेक वेळा भेटणारे किती साच्यानात्यातले. हा तसा नाही. कमी कमीच भेटत गेलेला. पण आंतरिक नात्यातला आणि या क्षणापासून तो कायमचा दूर जाणार, हरवणार, पुन्हा भेटणार-बोलणार नाही. लाखोंच्या गर्दीत स्वतःच्या धाग्यातल्या बिंदूंना आपण शोधत राहणार, तरीही तो आपल्याला दिसणार नाही. कारण तो धागाच आता निर्जीव होतो आहे, झाला आहे. तो संपला की हाही संपला. मग तो आपला कुणी नव्हे, निराळा कुणी नव्हे, हरघडी भेटणाऱ्या अनोळखी, नकोशा गर्दीप्रमाणे, पेपरमध्ये वाचाव्या लागणाऱ्या बिनरंगी, निर्जीव बातम्यातल्या नावाप्रमाणे! आयुष्याचा केवढा मोठा हा धोका, किती ही किंमत, न भरून निघणारी केवढी ही हानी!

मृणालचं मन सैरभैर होऊन गेलं. खचल्याप्रमाणे वाटलं. मिलिंद म्हणाला, 'निघूया का ? जाईपर्यंत... वेळ होईल.' दोघं परतली. दादा झोपले होते. वहिनीही खोलीत होती. घर सामसुम होते. मुलं हळू आवाजात काहीतरी खेळत होती. तिनं कुणालाच उठवलं नाही. मुलांशीच बोलली आणि नोकराला सांगून निघाली. बस मिळाली तेव्हा गर्दी, अजून दुपार असल्याने बेताची होती. पुढच्या बाकावर बसलेली दोघे कंडक्टरशी जोरजोरात सध्याच्या परिस्थितीवर चर्चा करत होती. कोण जिंकणार, कोण हरणार, सरकार कसं कोसळणार, कुठल्या नेत्याचं कुठं चुकलं, वगैरे जोरात चर्चा चालू राहिली. मिलिंद तिच्याकडे पाहून हसला. टर्मिनसला घराकडे जाणाऱ्या बसचा पत्ता नव्हता. मृणाल म्हणाली, 'तुला कुठे जायचं आहे आता ? तुझी दिशा निराळी असेल तर... मी थांबेन इथे, तू हवं तर रिक्षा घे. किंवा...'

मिलिंद काही क्षण विचार करत थांबला. मग म्हणाल, 'ठीक आहे. मी निघतो... सौरभला सांगशीलच... जास्त काय सांगू ?'



Scanned with OKEN Scanner

तिला वाटलं किती बरं होईल त्याला जर थांबता आलं तर. मिळून घरी जाऊ, तो राहील, गप्पा मारेल, जेवेल, मग सौरभ परतेल तेव्हा चकित होईल, आनंदी होईल आणि तिघं मिळून मस्त छान दोन दिवस घालवू. सौरभ सहज एक-दोन दिवस सुट्टी घेईल, नाहीतरी लग्नाला इतकी वर्ष होऊनही तो असा सतत फिरतीवर असल्यामुळे आपल्याला त्याच्याही सहवासाचं केवढं अप्रूप वाटतं, मग मनापासून आवडणारी ही दोघं, आपण तिघं... भरभरून आनंदी होऊ.

मग तिनं नजर उचलून मिलिंदकडे पाहिलं. तोही तिच्याकडेच अवघडलेल्या नजरेनं पाहात उभा होता. शेजारून मोठेमोठे मथळे छापलेल्या वर्तमानपत्रांचा ताजा संध्याकाळचा गठ्ठा घेऊन पोऱ्या गेला. लांबवर कुणाचीतरी नेहमीची बाचाबाची ऐकू आली. रांगेतली धडपडणारी, एकमेकांना ढकलून बसमध्ये चढणारी बायका पुरुष मुलं दिसली. स्टॉपच्या शेडच्या कोपऱ्यात मुटकुळं करून झोपलेली दरिद्री म्हातारी दिसली. कुठूनतरी फाटक्या कपड्यातला लहान मुलगा भिकेचा सराईत हात पुढे करून जवळजवळ स्पर्श करीत सरसावला. डोक्यावर जड फळांची टोपली घेऊन एक अगदी तरूण गरोदर मुलगी हाळी देत त्यांच्याकडे पाहात पाहात, थेड्या आशेने पुढे गेली आणि मृणाल भानावर आली.

समोर घराच्या दिशेची बस दिसली. तेव्हा घाईत म्हणाली, 'अरे... माझं लक्षच नव्हतं. घेते मी बस. नाहीतर पुन्हा अर्धा-पाऊण तास मिळायची नाही.'

तोही सुटल्यासारखा चटकन म्हणाला, 'बरं... जा..' ती रांगेत गेली. तो जवळच उभा होता. बसमध्ये चढताना तिनं पुन्हा वळून त्याच्याकडे पाहिलं. मान किंचित हलवून तो म्हणाला, 'हं... जपून रहा. दोघंही. बाय...' ती रांगेसकट आत शिरली. बस जवळजवळ भरलीच होती. इकडे तिकडे पाहात पुढे होत तिला अचानक बसायला जागा मिळाली. पण खिडकीजवळची नव्हे. तिनं तरीही थोडं उठून, वाकून बाहेर पाहिलं पण मिलिंद दिसला नाही. तिनं पर्समधून तिकिटाचे पैसे काढले. कंडक्टर पुढे गेला. मग अचानक तिला कुणी हाक मारल्याचा भास झाला. शेजारच्या बाईची माफी मागत तिनं उठून, वाकून खिडकीतून खाली बाहेर पाहिलं.

मिलिंदनं टाचा उंचावून हातातला ताजा जाईचा गजरा तिला दिला. 'जातच होतो. तेवढ्यात फुलं दिसली. सुंदर उमलल्या कळ्या आहेत नं? तुझं फुलांचं वेड...लक्षात आहे माझ्या. संध्याकाळपर्यंत मस्त फुलतील...'

तिनं गजरा घेतला आणि पाणावलेल्या डोळ्यांनी त्याच्याकडे पाहिलं. काही बोलताच येईना. आभार नाही, निरोप नाही. ते समजून आल्यासारखा तो हसला आणि त्यानं हात हलवला. कंडक्टरने शिटी मारली. ती आपल्या जागेवर बसली. बस हलली आणि मग आतून आलेला आवेग आवरायला तिनं तो गजराच चेहऱ्यावर धरला.

(भूमिका)

★★★



Scanned with OKEN Scanner